## वेचक

### वेदांता महाविद्यालयात आरोग्य शिबिर संपन्न

कल्याण: वेदांता महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटतर्फे ८ ऑगस्ट रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात बीएमआय, नेत्र व कान तपासणी, स्त्रीरोगतज्ज्ञांचा सल्ला आणि सवलतीच्या दरात विविध पॅथॉलॉजी चाचण्या करण्यात आल्या. परिसरातील नागरिक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत २०० हून अधिक जणांनी या शिबिराचा लाभ घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जनजागृतीचा संदेश पोहोचला. वेदांता फाऊंडेशन, कॉलेज आणि एनएसएसच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या शिबिरास प्राचार्य डॉ. प्रशांत शिंदे, तसेच एनएसएस अधिकारी मानसी दीक्षित व मुकेश अमृतकर यांचे मार्गदर्शन लाभले, तर शिक्षिका श्रद्धा चव्हाण यांचे विशेष सहकार्य मिळाले.

### सिंदूर आर्मी महारक्तदान यात्रा

कल्याण: ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून दिल्ली कॅन्टॉनमेन्टं येथील बेस हॉस्पिटलमध्ये 'सिंदूर आर्मी महारक्तदान यात्रा – वर्ष २' चे आयोजन करण्यात आले. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत, कल्याण शहर शिवसेना व्यापारी सेलचे अध्यक्ष विमल ठक्कर यांच्यासह महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग घेत रक्तदान केले. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री उदय सामंत व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे उपस्थित होते. ९ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर 'सेवा, समर्पण आणि राष्ट्र प्रथम' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना विमल ठक्कर म्हणाले, "देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या जवानांच्या सन्मानार्थ रक्तदान करणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे."

### 'ओळख क्रांतीवीरांची' स्पर्धा उत्साहात

कल्याण : आजच्या पिढीला क्रांतीवीरांचे कार्य, बलिदान आणि राष्ट्रप्रेमाची ओळख व्हावी, या उद्देशाने १६२ वर्षांची वाचनसेवा देणाऱ्या सार्वजनिक वाचनालय, कल्याणतर्फे क्रांती दिनाच्या पूर्वसंध्येला 'ओळख क्रांतीवीरांची' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वाचनालयाच्या सभागृहात ही स्पर्धा उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भारतीय वायुदलाचे सेवानिवृत्त अधिकारी धनंजय देशपांडे यांनी 'ऑगस्ट क्रांतीचा इतिहास' यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम व राष्ट्राभिमान जागृत व्हावा, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन केल्याचे वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी सांगितले. यापुढे 'ओळख संतमहात्म्यांची' ही स्पर्धाही घेण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. स्पर्धेत गजानन विद्यालय, जे.ई.ए. हायस्कूल, सुभेदारवाडा, शशांक विद्यालय, प्रगती महाविद्यालय (डोंबिवली) तसेच वाचनालयाच्या वाचकांनी सहभाग घेतला. विद्यार्थी गटात जिज्ञासा नाईक प्रथम, जागृती चव्हाण द्वितीय, यशस्वी माळी तृतीय, तर भाग्यश्री जोगी व स्वरा बनसोडे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले.

### धसईत ३०० वृक्षांची लागवड

मुरबाड : शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय भानुपाली यांच्या नेतृत्वाखाली मुरबाड तालुक्यात विविध ठिकाणी वृक्षलागवड मोहीम राबविण्यात आली. धसई ते मुरबाड तहसील कार्यालयादरम्यान राबविण्यात आलेल्या या मोहिमेत सुमारे ३०० वृक्षांची लागवड करण्यात आली. मुरबाडचे नायब तहसीलदार अमोल शिंदे यांच्या हस्ते मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या मोहिमेत 'झाडे लावा, झाडे जगवा' असा संदेश देण्यात आला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून त्यांचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. यावेळी ठाणे महानगरपालिकेचे माजी ज्येष्ठ नगरसेवक एकनाथ भोईर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख कांतीलाल कंटे, मुरबाड तालुकाप्रमुख रामभाऊ दुधाळे, नगरसेवक विनोद नार्वेकर, मुरबाड नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा नम्रता तेलवणे, अप्पा यशवंतराव तसेच युवासेनेचे आकाश बिराडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शिक्षण सभापतींच्या पाहणीत शिक्षकाविना वर्ग

भाईंदर : मीरा-भाईंदर महापालिका शाळांमधील शिक्षण व्यवस्था, स्वच्छता व विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांची पाहणी करण्यासाठी शिक्षण सभापती स्नेहा पांडे यांनी घोडबंदर येथील महापालिका शाळा क्रमांक ९ ला अचानक भेट दिली. यावेळी काही वर्गांमध्ये शिक्षक उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले. याबाबत मुख्याध्यापिकेकडे विचारणा केली असता संबंधित शिक्षक एसआयआरच्या कामासाठी बाहेर गेल्याचे सांगण्यात आले. एसआयआरचे काम महत्त्वाचे असले तरी शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान होणार नाही, याचीही काळजी घेणे आवश्यक असल्याचे स्नेहा पांडे यांनी सांगितले. या समस्येवर लवकरच योग्य तोडगा काढण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मीरा-भाईंदर महापालिकेच्या मराठी, हिंदी, गुजराती व उर्दू माध्यमांच्या ३६ शाळांमध्ये सुमारे ९ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पाहणीदरम्यान शाळेतील स्वच्छता, विद्यार्थ्यांना दिला जाणारा आहार तसेच उपलब्ध सुविधांचीही सभापतींनी पाहणी केली. महापालिका शाळांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे स्नेहा पांडे यांनी सांगितले.

# डोळखांब-टोकावडे एसटी बससेवेची मागणी

◆ मुरबाड (प्रतिनिधी):

शहापूर आणि मुरबाड हे दोन्ही तालुके भौगोलिकदृष्ट्या जवळ असून, दोन्ही तालुक्यांतील नागरिकांचे सामाजिक, व्यावसायिक व दैनंदिन व्यवहार मोठ्या प्रमाणात परस्परांशी जोडलेले आहेत. मात्र, या भागात थेट सार्वजनिक बससेवेचा अभाव असल्याने नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. शहापूर तालुक्यातील डोळखांब, शेंनवा आणि किनवली या परिसरात महत्त्वाच्या बाजारपेठा असून मुरबाड तालुक्यातील नागरिकही खरेदी-विक्री, आरोग्य, शिक्षण, रोजगार तसेच शासकीय कामांसाठी या भागात मोठ्या प्रमाणावर ये-जा करतात. त्यामुळे डोळखांब ते टोकावडे नियमित एसटी बससेवा सुरू करण्याची मागणी डोळखांब येथील डॉ. वामन साबळे यांनी राज्य परिवहन विभागाकडे केली आहे. कसारा–कर्जत राज्य मार्ग क्रमांक ७८ हा डोळखांब, पांढरापाडा, टोकावडे, वैशाखरे, धसई, कपाडे मार्गे कर्जत परिसराला जोडतो. या मार्गावर बससेवा सुरू झाल्यास शहापूर व मुरबाड तालुक्यांतील अनेक गावांतील नागरिकांची वाहतुकीची गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे. विशेषतः विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, शेतकरी, छोटे व्यावसायिक आणि रोजंदारीसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना या बससेवेचा मोठा फायदा होऊ शकतो. तसेच दोन्ही तालुक्यांमधील दळणवळण सुलभ होऊन स्थानिक बाजारपेठांनाही चालना मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाने डोळखांब–टोकावडे मार्गाचे तातडीने सर्वेक्षण करून प्रवाशांची गरज लक्षात घेता या मार्गावर नियमित एसटी बससेवा सुरू करावी, अशी मागणी डॉ. वामन साबळे यांनी केली आहे.

# मिरा-भाईंदर महापालिकेचा मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेण्याचा घाट

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आरोपाने खळबळ

◆ भाईंदर(वार्ताहर) :

मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांच्या कामांची देयके अदा करण्यासाठी सत्ताधारी भाजपकडून खासगी बँकेकडून कर्ज घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, या कर्जासाठी महापालिकेच्या मालमत्ता तब्बल ३० वर्षांसाठी खासगी बँकेकडे गहाण ठेवण्याची अट असल्याचा आरोप परिवहन मंत्री तथा शिवसेना नेते प्रताप सरनाईक यांनी केला आहे. मिरा-भाईंदर शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांची समस्या दूर करण्यासाठी सिमेंट काँक्रिटचे रस्ते उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या कामांसाठी निधीची कमतरता असल्याने खासगी बँकेकडून कर्ज घेण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. शासनाने कर्ज घेण्यास तत्त्वतः मंजुरी दिली असली तरी प्रत्यक्ष कर्ज उभारणीसाठी नगरविकास विभागाकडून मान्यता दिली जात नसल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला आहे. नगरविकास विभागाकडून ही मान्यता रखडवली जात असल्याचा आरोप करत भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांनी १० ऑगस्ट रोजी फाउंटन हॉटेल येथे रस्ता रोको आंदोलन करण्याची घोषणा केली आहे.

दरम्यान, या आरोपांचे प्रताप सरनाईक यांनी खंडन केले आहे. सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांची देयके अदा करण्यासाठी महापालिकेच्या मालमत्ता खासगी बँकेकडे ३० वर्षांसाठी गहाण ठेवून कर्ज घेण्याचा प्रस्ताव असल्याचे त्यांनी सांगितले. महापालिकेची मालमत्ता दीर्घकाळासाठी गहाण ठेवणे योग्य नसल्यामुळे नगरविकास विभागाने या प्रस्तावाला तत्काळ मंजुरी दिलेली नाही, असा दावा सरनाईक यांनी केला. महापालिकेच्या मालमत्ता गहाण न ठेवता सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्याची भूमिका आपण घेतली असल्याचेही सरनाईक यांनी स्पष्ट केले. शासनाकडून निधी मिळवून रस्त्यांची कामे करण्यासाठी आपण मान्यता मिळवली असल्याचा दावा त्यांनी केला.

**२३ टक्के कमिशनच्या मागणीचा आरोप**

■ सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांची कामे पूर्ण करून देयकांच्या प्रतीक्षेत असलेल्या कंत्राटदारांना पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवले जात असल्याचा आरोपही सरनाईक यांनी केला. यासाठी 'कोठारी' नामक व्यक्तीकडून २३ टक्के कमिशनची मागणी केली जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. त्यामुळे अशा पद्धतीने कर्ज उभारण्यास आपण विरोध करत असल्याचे सरनाईक यांनी म्हटले आहे.

# बिल्डरांच्या नादी लागून महाराष्ट्र दहा वर्षे मागे नेला

## गणेश नाईक यांचा सरकारला घरचा आहेर

◆ नवी मुंबई (प्रतिनिधी):

'बिल्डरांच्या नादी लागून महाराष्ट्र दहा वर्षे मागे नेला,' असा घणाघात वनमंत्री गणेश नाईक यांनी केला. नवी मुंबईत क्लस्टर पुनर्विकासाच्या माध्यमातून बिल्डरांना फायदा करून देण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला तीव्र विरोध करू, असा इशाराही त्यांनी दिला. सानपाडा येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. १० ऑगस्ट रोजी होणाऱ्या नवी मुंबई महापालिकेच्या महासभेत क्लस्टरच्या मुद्द्यावर भाजपचे सर्व नगरसेवक उपस्थित राहणार असून, पक्षाकडून व्हीप बजावण्यात येणार असल्याचे नाईक यांनी सांगितले.

'जनतेला गृहीत धरून कोणी नाटक करेल तर त्या नाटकाचा तमाशा काय आहे, हे लोकांना दाखवेन. आम्हाला बुद्धू समजून टपली मारणार असेल तर त्याचा हात धरून त्याची लायकी दाखवण्याची ताकद आमच्यात आहे,' अशा शब्दांत नाईक यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका करत, कोणत्याही व्यक्तीशी आपला वैयक्तिक वाद नसल्याचे सांगतानाच जनतेला गृहीत धरून निर्णय घेण्याचा प्रयत्न केला तर त्याला विरोध करू, असे नाईक यांनी स्पष्ट केले. नवी मुंबईतील नियोजनबद्ध कॉलनी परिसरात क्लस्टर पुनर्विकास लागू करण्यास नाईक यांचा तीव्र विरोध आहे. दाटीवाटीच्या वसाहती, गावठाण किंवा झोपडपट्टीसदृश भागांच्या पुनर्विकासासाठी क्लस्टर योग्य ठरू शकतो. मात्र, २० वर्षे जुन्या इमारती असलेल्या नियोजनबद्ध कॉलनी परिसराला क्लस्टरच्या कक्षेत आणणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले. अशा ठिकाणी स्वतंत्र पुनर्विकासाला प्राधान्य द्यावे, अशी त्यांची भूमिका आहे. 'चार एफएसआयमध्ये काम भागत असताना अतिरिक्त एफएसआयच्या माध्यमातून बिल्डरांच्या खिशात पैसे घालण्याची रचना केली जात असेल तर ती चालू देणार नाही,' असे नाईक यांनी स्पष्ट केले. सर्वसामान्यांच्या जमिनी आणि हक्कांच्या किंमतीवर बिल्डरांचा फायदा करून देणारे निर्णय सहन केले जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

**नाईक-नगरविकास खाते आमनेसामने**

१० ऑगस्टच्या नवी मुंबई महापालिका महासभेत क्लस्टर धोरणातील बदलांविरोधात विशेष ठराव मांडण्यात येणार असून, भाजपच्या सर्व नगरसेवकांना पूर्णवेळ उपस्थित राहण्यासाठी व्हीप बजावण्यात येणार आहे. सभागृह नेते सागर नाईक प्रशासनाला याबाबत जाब विचारणार आहेत. युनिफाइड विकास नियंत्रण नियमावलीतील क्लस्टर तरतुदींना नाईक यांनी यापूर्वीही विरोध केला आहे. वाढीव एफएसआयमुळे वाहतूक, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पार्किंगसह नागरी सुविधांवर ताण येईल, असा त्यांचा दावा आहे. महासभेच्या ठरावावर महिनाभरात निर्णय न झाल्यास न्यायालयात जाण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. त्यामुळे १० ऑगस्टची महासभा क्लस्टरच्या मुद्द्यावरून महत्त्वाची ठरणार आहे,याकडे लागले आहे.

# कल्याणमध्ये लवकरच आदिवासी भवन

## आदिवासी दिनानिमित्त महापौर ॲड. हर्षाली चौधरी यांची घोषणा

◆ कल्याण (प्रतिनिधी):

जागतिक आदिवासी दिनानिमित्त रविवारी कल्याणमध्ये आदिवासी समाजाच्या वतीने भव्य शोभायात्रा काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत हजारो आदिवासी बांधव सहभागी झाल्याने शहरात आदिवासी संस्कृती, परंपरा आणि एकतेचे दर्शन घडले. ढोल-ताशांच्या गजरात महिला, तरुण आणि पुरुषांनी पारंपरिक नृत्य सादर करत उत्साह व्यक्त केला. शोभायात्रेत सहभागी झालेल्या केडीएमसीच्या महापौर ॲड. हर्षाली चौधरी यांनी कल्याण-डोंबिवलीत लवकरच आदिवासी भवन उभारण्यात येणार असल्याची घोषणा केली. आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी हे भवन महत्त्वाचे केंद्र ठरेल, असे त्यांनी सांगितले. तसेच महापालिका हद्दीतील आदिवासी पाड्यांमध्ये रस्ते, पाणी यांसह मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातील, असे आश्वासनही त्यांनी दिले.

शोभायात्रेला सुभाष मैदान येथून सुरुवात झाली. बाजारपेठ परिसरातून मार्गक्रमण करताना आदिवासी कला, संस्कृती व परंपरेचे रंगीबेरंगी दर्शन घडले. शोभायात्रा पाहण्यासाठी मार्गावर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल, सचिव किशोर शेळके, महिला व बालकल्याण सभापती सारिका जाधव, नगरसेवक किरण भांगले, नगरसेविका शीतल मंडारी, संयुक्त आदिवासी समिती मुंबईचे अध्यक्ष प्रभुदास पंधरे, आदिवासी समिती दिल्लीचे अध्यक्ष रामनाथ भोजने, अग्निशमन विभागाचे नामदेव चौधरी, सहाय्यक आयुक्त जयराम शिंदे यांच्यासह विविध पदाधिकारी व आदिवासी समाजबांधव उपस्थित होते. संयुक्त आदिवासी उत्सव मंडळ कल्याण-मुंबई, आदिवासी प्रतिष्ठान ग्रुप कल्याण यांच्यासह विविध आदिवासी संस्था व कार्यकर्त्यांनी शोभायात्रेत सहभाग घेतला. सुरक्षेच्या दृष्टीने कल्याण बाजारपेठचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आदिवासी समाजाची संस्कृती समाजासमोर आणणे तसेच नव्या पिढीला आपल्या सांस्कृतिक वारशाशी जोडणे, हा शोभायात्रेचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## खड्ड्यांविरोधात मनसेचे आंदोलन

भाईंदर : शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरत असल्याच्या निषेधार्थ मीरा-भाईंदर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे 'भीक मांगो' आंदोलन करण्यात आले. मनसेचे मीरा-भाईंदर शहराध्यक्ष संदीप राणे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी मिरारोड रेल्वे स्थानकाजवळील मच्छी मार्केट परिसरात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी मनसे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नागरिकांकडून प्रतीकात्मक स्वरूपात भीक मागून महापालिका प्रशासनाचा निषेध केला. आंदोलनातून जमा झालेली रक्कम महापालिका आयुक्तांना खड्डे बुजविण्यासाठी सुपूर्द करण्यात येणार असल्याचे मनसेकडून सांगण्यात आले. या आंदोलनात मनसेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**छोट्या जाहिराती**

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM KHURSHEED ALAM TO KHURSHID ALAM MOHAMMED MOHSIN KHAN AS PER AADHAR CARD

**प्रहार मुंबई**

**वाचकांना विनम्र सूचना**

प्रहार वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिराती आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'प्रहार' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'प्रहार' वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय
Email:- integratedmumbai.ee@mahapwd.com
दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६
**ई-निविदा सूचना क्र. ४४ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील सर्व्हे क्र. 341, सीटीएस क्र. 629 येथील कौटुंबिक न्यायालय इमारतीमधील उर्वरित अंतर्गत कामे, फर्निचर आणि तत्सम कामांचे बांधकाम करणे. | १२,७५,१३,०१५/- |

(एकूण ०१ कामे)
**ई-निविदा उपलब्ध कालावधी :** दिनांक १०/०८/२०२६ सकाळी १०.३० पासून ते दिनांक १७/०८/२०२६ रोजी १५.०० पर्यंत
**निविदा पूर्व बैठक :** दिनांक १३/०८/२०२६ रोजी दुपारी १५.०० वाजता. मा. मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, ४ था मजला, २५ मझबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
**ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक १९/०८/२०२६ रोजी १५.०५ वाजता**
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.एघ (सा.बां.)/निविदा/ ४३३०
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन,
२ रा मजला, २५ मझबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६ दिनांक : ४/८/२०८६
डीजीआयपीआर/२०२६-२७/सी२१६७

सही/-
कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सा.बां.विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील " इमारत दुरुस्ती " या लेखाशिर्षकाअंतर्गत मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत समिती कार्यालयातील सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये अभियंता केबिन तयार करणे, फर्निचर पुरविणे व इतर अनुषंगिक स्थापत्य कामे करणे. या एक कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि. १०/०८/२०२६ ते दि.१७/०८/ २०२६ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि. १७/०८/२०२६ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि. १७/०८/ २०२६ सायं. १७.०० वा. निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा मुं. प्र.स/३५८/२०२६-२७ सही/-
दि.०७.०८.२०२७ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

**उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**
UJJIVAN
**नोंदणीकृत कार्यालय:** ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
**क्षेत्रिय कार्यालय:** ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना**

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आणि इरठे आयएनआर मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 44162101300 00444 / 4416- कल्याण | १.सुधाकर गणपत चाफे, २. शुभांगी चाफे अनु. क्र. १ येथे: सी/ओ इंडियन नेव्ही, एसएच-०९, टेकेट क्र. ५६१६९ बी, नवल स्टोर डेपो, हे बंदर रोड, महिंद्र अँड महिंद्र कं. जवळ, शिवडी, मुंबई-३३, महाराष्ट्र-४०००३३. दोघे येथे देखील: सदनिका क्र. १०४, विजय अपार्टमेंट, महालक्ष्मी सुपरमार्केट जवळ, एचपी पेट्रोल पंपाच्या मागे, वांगणी पूर्व, ठाणे, महाराष्ट्र -४२१५०३, | १८.०१.२०२४/ १५.०१.२०२४ अनुसार रु. ९,५०,९१३.९ | 25.04.2024 | Rs. 560000/- / Rs. 56000/- |

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :** गाव शेलू, तालुका कर्जत आणि नोंदणीकरण जिल्हा रायगडच्या शेलू ग्रामपंचायत, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथे असलेल्या २७५ चौ. मी. मोजमाप असलेल्या बिगर शेत जमिनीचा धारण केलेला गट क्र. १४०/६ च्या सर्व खंड आणि भूखंडावर बांधण्यात आलेल्या "यशराज अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील ४३५ चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. १०३ श्री सुधाकर गणपत चाफे आणि श्रीमती शुभांगी सुधाकर चाफे ह्यांच्या मालकीचे.

| | | |
|---|---|---|
| मालमत्ता (मत्ता) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ | :: | १४-०८-२०२६ आणि २५-०८-२०२६ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान |
| बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक | :: | २८.०८.२०२६ रोजी ११.०० वा. ते सायं. ५.०० वा. पर्यंत |
| लिलावाचा दिनांक आणि वेळ | :: | २९-०८-२०२६ रोजी दु. २:०० वा. ते सायं. ५:०० वा. दरम्यान |

इसारा रक्कम ठेव (इठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत).

**बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाण:** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१. (संपर्क तपशील: अमोल जोशी : ७९००१२७५५५, चंद्रमोहन चौधरी: ८१०८८३८२८६.)

**अटी आणि शर्ती :** ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.

1. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार केलेल्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छुक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमत्ता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
2. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छुक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छुक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
3. इच्छुक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
4. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्ती: प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०१). इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच